| MHKO070028832025 | संक्षिप्त फौज.खटला क्र.१३९६/२०२५<br>निशाणी क्र. १२/क सोबत |
|---|---|

:: न्या य नि र्ण य ::

(दि.०२/०६/२०२६)

**१.** अभियोगपक्षाचा पुरावा, युक्तीवाद पाहता खालील मुद्दे माझ्यासमोर निष्कर्षासाठी उपस्थित झाले आहेत, त्यावर कारणमिमांसेसह निष्कर्ष खालील प्रमाणे दिले आहे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दि.१३/०३/२०२५ रोजी २०.४५ वाजणेच्या सुमारास घटनास्थळी यातील आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन ज्याचा क्र. एम.एच.–११–यु.– ३२७६ हे बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवले जेणेकरुन मानवी जिवीतास धोका उत्पन्न होईल किंवा दुस–यांना इजा किंवा दुखापत होईल ? | होकारार्थी. |
| २. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद वेळ, दिनांक व घटनास्थळी आरोपी हा त्याच्या ताब्यातील नमुद वाहन हे दारुचे सेवन करुन चालवित असताना मिळून आला ? | होकारार्थी. |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

२. सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.एस.पाराज–पाटील व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.जी.आर.चादरे यांचा युक्तीवाद श्रवण केला.

## कारणमीमांसा

**मुद्दे क्र.१ व २ करीता –**

३. मुद्दे क्र.१ व २ हे एकमेकांशी निगडीत व एकाच घटनेतील भाग असल्याने त्यांची एकत्रीत चर्चा करणे सोईस्कर होईल.

४. आरोपीविरुद्ध ठेवण्यात आलेला आरोप सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने फिर्यादी प्रदिप विलास कांबळे (साक्षीदार क्र.१) यांची साक्ष नि.१२ सोबत नोंदवली आहे. कागदोपत्री पुराव्यामध्ये अभियोगपक्षाने फिर्याद (निशाणी क्र.१३) व घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.१४) शाबीत केलेली आहे. तसेच आरोपीतर्फे ब्रेथ ॲनालायझर प्रमाणपत्र (नि.क्र.१५) कागदपत्रे मान्य करण्यात आली आहेत. अभियोगपक्षाने पुरावा संपलेबाबतचे तसदिकपत्र (निशाणी क्र.१६) दाखल केल्यानंतर आरोपीचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ३५१ (१) (ब) अन्वये निवेदन नोंदवले. आरोपीने अभियोगपक्षाने त्यांच्याविरुध्द खोटी केस दाखल केल्याचे कथन केले असुन त्यांच्या वतीने पुरावा दिलेला नाही.

५. प्रदिप (सा.क्र.१) यांच्या साक्षीनुसार दि.१३/०३/२०२५ रोजी ते जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे ट्राफीक अंमलदार म्हणुन कार्यरत असताना त्यादिवशी होळीच्या अनुषंगाने ते, स.पो.नि.कदम, म.पो.हे.कॉ.बन्ने, यांचेसह २०.४५ दरम्यान उदगाव अंकली टोल नाका, जयसिंगपूर येथे नाकाबंदी करत असताना सांगली–कोल्हापूर रोडवर समोरुन एक इसम त्याचे ताबेतील वाहन बेदरकारपणे, हयगयीने, वेड्यावाकड्या पध्दतीने व लडबडत चालवित येत असताना दिसला. ते पाहून त्यांनी त्याला थांबवून त्याची चौकशी केली असता सदर इसमाने त्याचे नांव महादेव शंकर शेळके, रा.राजीव गांधी नगर, जयसिंगपूर असे सांगीतले. त्याच्या गाडीचा क्रमांक हा एम.एच.–११–यु.–३२७६ असल्याचे निदर्शनास आले. सदर इसमास ताब्यात घेवून तपासले असता त्याने दारु सेवन केले असल्याचे निदर्शनास आले. म्हणून त्याची ब्रेथ ॲनालायझर मशिनने तपासणी केली

असता तो दारुच्या अंमलाखाली असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर साक्षीदाराने आरोपीविरुध्द फिर्याद (नि.क्र.१३) दाखल केली व तपास अधिकारी यांनी पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा (नि.क्र.१४) केला.

६. आरोपीतर्फे वकीलांनी घेतलेल्या उलटतपासात उपरोक्त साक्षीदाराची विधाने खोडली जातील असे कोणतेही कथन दप्तरी आलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या साक्षीवर अविश्वास निर्माण होईल असे कोणतेही विधान अगर पुरावा बचावपक्षाने अभिलेखावर आणलेला नाही. या व्यतिरीक्त ब्रेथ ॲनालायझर प्रमाणपत्र (नि.क्र.१५) आरोपीने मान्य केलेले आहे. सदरचा अहवाल हा मोटार वाहन कायदयाच्या कलम २०३(६) मधील तरतुदीनुसार पुरावा म्हणुन ग्राहय धरण्यात येतो. सदर प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता घटनेच्या दिवशी व स्थळी आरोपीने दारुचे सेवन केले होते व तो दारुच्या अंमलाखाली होता असे दिसून येते. सदरचे प्रमाणपत्र, फिर्याद व घटनास्थळ पंचनामा हे साक्षीदाराच्या कथनांना दुजोरा देतात. अशा परिस्थीतीत प्रदिप (सा.क्र.१) यांचा एकमेव, प्रत्यक्षदर्शी व ठोस पुरावा असल्याने तो नाकारता येणार नाही.

७. एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीने घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी त्यांच्या ताब्यातील वाहन जिचा क्र.एम.एच.–११–यु.–३२७६ हे दारुचे सेवन करुन बेदरकारपणे, हयगयीने, वेड्यावाकड्या पध्दतीने व लडबडत चालवले ही बाब अभियोगपक्षाने ठोस व सबळ पुराव्यानिशी विनासंदेह सिध्द केल्याचे माझे मत बनते. करीता मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवण्यात येतात. सदर निष्कर्षाआधारे आरोपी भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८१ व मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८५ अन्वये शिक्षेस पात्र असल्याचे माझे मत बनते, त्यामुळे शिक्षेच्या मुद्दयावर उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकण्यासाठी न्यायनिर्णय नोंदवण्याचे काम मी थांबवत आहे.

स्वाक्षरीत/–

ठिकाण :– जयसिंगपूर.

दिनांक :– ०२/०६/२०२६

**( अ.त्रिं.मनगिरे )**

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

८. आरोपी, त्यांचे विधीज्ञ व सरकारी वकील यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीचा हा पहिलाच गुन्हा असून आरोपी हा त्याच्या घरातील एकमेव कमावता व्यक्ती असल्याने त्याला कडक शासन केल्यास त्याच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येईल. त्यामुळे त्याला कमीतकमी शिक्षा करावी अशी विनंती आरोपीच्या विधीज्ञांनी केली. याउलट गुन्हयाचे गांर्भीय पाहता सरकारी वकीलांनी आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा करावी अशी विनंती केली.

९. उभयतांच्या युक्तीवादाचा विचार करता तसेच अभिलेखावरील पुरावा, घटनेचे गांर्भीय इत्यादी बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.३ च्या निष्कषार्थ मी पुढील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी नामे **महादेव शंकर शेळके,** रा.राजीव गांधी नगर, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांना भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८१ व मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८५ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयांकरीता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७८ (२) नुसार दोषी ठरवण्यात येते.

२. आरोपीला भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८१ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाकरीता न्यायालयीन कामकाज संपेपावेतो साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येते व रक्कम रु.६००/– (र.रु.सहाशे फक्त) इतक्या दंडाची शिक्षा सुनावण्यात येते. दंडाची रक्कम न भरल्यास दोन दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येते.

३. आरोपीला मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८५ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाकरीता न्यायालयीन कामकाज संपेपावेतो साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येते.

४. आरोपीने बंधपत्रानुसार न्यायालयाच्या स्वाधीन व्हावे.

५. न्यायालयीन कामकाज संपेपावेतो साध्या कारावासाची शिक्षा ही आरोपीने एकत्रीत भोगावयाची आहे.

६. सदर न्यायनिर्णयाची मोफत प्रत आरोपीस देणेत यावी.
(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात देण्यात आणि घोषीत करण्यात आला.)

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.06.02 17:14:10 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

ठिकाण :– जयसिंगपूर.

**( अ.त्रिं.मनगिरे )**

दिनांक :– ०२/०६/२०२६

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale. |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 02/06/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 02/06/2026. |
| Judgment/order uploaded on | 02/06/2026. |